PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 10, ISSUE 3

# गांधीचा राष्ट्रवाद

**अरुण वाहूळ**
**सहायक प्राध्यापक, इतिहास विभाग,**
**विवेकानंद महाविदयालय छत्रपती संभाजीनगर.**
**महाराष्ट्र भारत**

राष्ट्रवाद हा एक आधुनिक विचार आहे. ज्याचा उदय १८ व्या शतकामध्ये झाला. याच वेळी राज्य या संकल्पनेचा विकास झाला. त्याने राजकीय दृष्टीकोनातून स्वःताची एक वेगळी ओळख निर्माण केली.राष्ट्रवादाच्या उदयाचे स्वरूप राजकीय घटनाक्रमाचे केंद्र बिंदू राज्य निश्चित झाले. हळूहळू याच विचाराने आपली एक व्यापक ओळख स्थापित केली. जागतिकस्तरावर राष्ट्रवादाचा प्रचार प्रसार गैर आधुनिक समाजाचे युरोपीयकरन व आधुनिकीकरनाने झाले.याच्या उदयाबरोबर नवीन सिद्धांताचा उदय झाला. राष्ट्रवाद एक राजकीय विचार आहे जो आधुनिक विचाराबरोबर आधुनिक समाजाची स्थापना करतो. ते एक बहुसंख्याक लोकांच्या असीम श्रद्धेचे, विश्वासाचे व राजकीय राष्ट्राप्रती त्यांची भक्ती असते. ही संकल्पना केवळ राजकीय संघटनेच्या रुपामध्ये तयार होत नाही तर सांस्कृतिक व आर्थिक हालचालींना नवे रु प्रदान करते.१ भारतामध्ये राष्ट्रवादाचे आपले वैशिष्टे आहे. गांधीजीच्या विचाराचे विश्लेषण करण्यापूर्वी भारतीय राष्ट्रवादाच्या उदया संबंधी दोन अनिवार्य बिंदूचे विश्लेषण करणे गरजेचे आहे.१ हे सर्वविवादित आहे कि भारतीय राष्ट्रवादाचा उदय युरोपीय साच्या मध्ये झाला नाही. भारतीय राष्ट्रवाडचे स्वरूप युरोपीय राष्ट्रावादापेक्षा वेगळे राहिले आहे. युरोपीय राष्ट्रवादामध्ये जैविक एकता, विशिष्ट क्षेत्रफळ, एक समान अर्थव्यवस्था, भाषिक समानता, राष्ट्राप्रति एकत्र विचार व सांस्कृतिक समानते पर्यंत सीमित असते.२ पण भारतीय राष्ट्रवादाचा विकास सामाजिक- आर्थिक व राजकीय पार्श्वभूमीच्या सावलीमध्ये झाला. त्यामुळेच त्याची प्रकृती व परंपरा युरोपीय राष्ट्रावादापेक्षा वेगळी आहे.

२. भारतीय राष्ट्रवाद काही क्रांतिकारी विचार आणि आर्थिक व्यवस्थेच्या विभिन्न स्तरावर होणाऱ्या विकासावर किंवा सामाजिक परिवर्तनाच्या उत्पादना वर पण नाही. तसेच तो सामाजिक विकास पण नव्हता. वसाहतवादी शासनाच्या उत्पीडना विरुद्ध लढणाऱ्या विरुद्ध तो प्रेरित होऊन त्याचा विकास झाला.त्यामुळे संघर्षाचा मुख्य उद्देश भारताचे स्वातंत्र्य झाले. असे म्हटले जाऊ शकते कि भारतीय राष्ट्रवाद स्वातंत्र्यासाठी उभ्या राहिलेलेल्या संघर्षाचा परिणाम होता.३

**गांधीवादी दृष्टीकोन**

गांधीने राष्ट्रवादा संबंधी स्वतंत्र पाने वेगळे मौलिक विचार मांडलेले नाही. त्यामुळे गांधीच्या विचारातील राष्ट्रवाद समजून घेण्यासाठी त्यांची विचारधारा आणि त्यांचे संपूर्ण तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणे आवशयक आहे.४ गांधीसाठी राष्ट्रवाद भारतच्या स्वतंत्र संघर्षाचा हेतू निहित होता. त्यांच्या विचारांना याविषयी समजून घेण्यासाठी दोन गोष्टीवर विचार करणे गरजेचे आहे. त्यामध्ये एक गोष्ठमहत्वाची आहे कि गांधीच्या मनामध्ये राष्ट्रावाडचा विचार भारतामध्ये असताना नाही तर दक्षिण आफ्रिकेत असताना जन्मला आला होता. दुसरे चंपारण, बारडोली पेक्षाट्रान्सवालच्या राजकीय पार्श्वभूमीवर गांधीने आपल्या अद्भुत राजकीय विचार व त्याच्या साधनाचा विकास केला.५ गांधीने कुठेही राष्ट्रवादासंबंधी विचार मांडले नसल्यामुळे संपूर्ण गांधी वाडःमयाचा अभ्यास करणे गरजेचे आहे. गांधीचा रचनाक्रमाचे अध्यानाचे फलस्वरूप काही तथ्य समोर येतात.१ गांधीचा राष्ट्रवाद सामायोजनावर आधारित होता. ज्यामध्ये भारताच्या विविध समुदायांना चित्रित करणे अभिप्रेत होते.६ त्यांच्या राष्ट्रवादी विचाराधारेमध्ये धार्मिक समूहच नाही तर जाती जमातीला पण जागा होती. गांधीच्या मनामध्ये भारताचे वास्तविक चित्रामध्ये वर्ग, जात, धार्मिक समूह होते. या तत्वामुळे उपमहाद्वीपाच्या जनमानसामध्ये राष्ट्रीय भावना भरण्यामध्ये जितके समर्थ गांधी होते त्याच्या इतका त्यांच्या अगोदर ही कोणी झाला नाही आणि त्यांच्या नंतरही.७ ब्रिटीश सत्तेला बाहेर काढण्यासाठी तयार केलेल्या कार्यक्रमामध्ये जात, वर्ग, समुदाय, धार्मिक समूहाना एका व्यासपीठावर एकत्र करून आपल्या राष्ट्रवादी विचाराच्या भावनेने त्यांना प्रेरित केले. हे काम गांधीनी सर्वांना एकत्र करून केले. त्याचा प्रयत्न हा पण होता होता कि विविध विचाराच्या लोकांना देखील एकत्र करते.

२.) गांधीचा राष्ट्रवाद वासाहतिक सत्तेपासून प्रेरित होता पण त्यांची साधने युरोपियनांपेक्षा भिन्न होती. त्यांनी हिंसेवर आधारलेला राष्ट्रवाद बाजूला करून अहिंसक राष्ट्रवाद पुढे आणल्या. त्याचे

म्हणणे होते कि प्रेम व आत्म्याच्या शक्ती पुढे हत्याराची शक्ती निष्प्रभ आहे.८ त्यांचे असे मत होते कि हिंसेमुळे आपसातील संवाद नष्ट होतो.आणि समाजामध्ये हिंसक प्रवृत्तीला वाव मिळतो. त्यांचा असा विचार होता कि भारतीयांना ब्रिटीश सरकारच्या चुका माहिती झाली पाहिजे. त्यांच्या नजरेमध्ये राष्ट्राच्या मुक्तीसाठी हिंसेकला कोणती जागा नव्हती.९ ३)गांधीचा राष्ट्रवाद समाजातील सर्व वर्गासोबत कसलाही भेदभाव विना सर्वांना सामावून घेईल याची अभिव्यक्ती होता. ते जाती व वर्गाच्या आधारावर विषमतेच्या विरुद्ध होते. त्यांनी जातीमुळे होणाऱ्या भेदभावावर नेहमीच टीका केली. त्यांनी त्यांच्या संपूर्ण जीवन काळामध्ये अस्पृश्यतेच्या विरुद्ध संघर्ष केला. १९३२ मध्ये त्यांनी १२,५०० मैलाची यात्रा केली. त्यांनी हरिजन कोषाची स्थापना केली.

४.)गांधीचा राष्ट्रवाद धर्मापासून प्रेरित असूनही धर्मनिरपेक्ष होता. गांधीच्या दृष्टीने भारत विविध धर्म आणि विविध भाषेचा देश होता. गांधीद्वारे जेंव्हा जेंव्हा धर्माविषयी बोलत होते. तेंव्हा त्यांच्या विचारामध्ये अस्पष्टता दिसत होती. धर्माप्रती त्यांचा दृष्टीकोन अत्यंत व्यापक होता. धर्मामध्ये असणाऱ्या रूढी परंपरा, रीतीरिवाज आणि अंधश्रद्धा तोडण्याची इच्छा व्यक्त करत होते.१०

हिंद स्वराज लिहीपर्यंत चर्चेचा हा मुद्दा होता कि भारताची राष्ट्र म्हणून स्थापना धार्मिक आधारावर संभव नाही. या पुस्तकामध्ये त्यांनी राष्ट्र शब्दासाठी प्रजा शब्द वापरला आहे. त्यांचा विश्वास होता कि प्रजा नामक शब्दामुळे भारतामध्ये एक सामुहिक संस्कृती निर्माण होईल.११ गांधी अशा एका राष्ट्राची निर्मिती करू इच्छित होते, ज्याचा पाया सदभावना, सहअस्तित्व व समन्वयावर आधारित असावा. काही विद्वानाचे असे ही मत आहे कि गांधीच्या शेवटच्या दिवसामध्ये त्यांचा धार्मिक बहुलतावादाची सीमा बहुल हिंदुत्वाच्या पुढे जाऊन बहुधर्मी तत्वाच्या पुढे गेली. त्यांच्या धार्मिक विचार व तत्त्वज्ञानाचे स्वरूप पूर्णतः वैश्विक झाले होते.१२ ५.) गांधीच्या राष्ट्रावादामध्ये आंतरराष्ट्रीयवादी पट होता त्याचे असे मत होते कि ते राज्य व राष्ट्राला एकमेकापासून वेगळे समजून होते. त्यांच्या मतानुसार राष्ट्र अशा व्यक्तीचा अर्थपूर्ण सामिलीत स्वरूप आहे ज्यामध्ये प्रत्येक व्यक्ती आपली अंत शक्ती पासून परीचलीत होऊन एक समान लक्षाला साधण्याचा प्रयत्न करतो.

गांधीच्या राष्ट्रवादाच्या विचारावर अनेक विद्वानांनी टीका केलेली आपणास पाहण्यास मिळते. गांधीवर टीका करणारे असा दावा करतात कि गांधीनी राजकारण व धर्म यांची सांगड घातली. गांधीनी खिलाफत आंदोलनाच्या माध्यमातून असहकार चळवळी च्या माध्यमातून हिंदू मुस्लिमांना

एकत्र आणले. पण यामुळे राजकीय परिपक्वता भारतीय लोकामध्ये अली नाही. कारण मुस्लीम धार्मिक मुद्यामुळे आंदोलनात आले होते,

वरील विश्लेषणावरून हे स्पष्ट होते कि गांधीचा राष्ट्रवादाची रूपरेषा तयार करणे अत्यंत कठीण काम आहे. याचे मुख्य कारण गांधीवादी विचारधारेमधील जटिलता आहे. पण असे असले तरी गांधीनी भारतीय लोकांमध्ये राजकीय आणि राष्ट्रीय जाणीव तयार करण्यास मदत केली.

## संदर्भ :

१. एनसाइक्लोपिडिया ब्रिटानिका, शिकागो १९८७, खंड ८, पृ ५५२.

२. ई एच.कार, नेशनलीज्म , १९७९, पृ XX.

३. अल्योसीस, नेशनलीज्म विदाऊट ए नेशन इन इंडिया, ऑक्सफोर्ड,१९९७, पृ ५.

४. आर. एस. यादव, गांधीयन परस्पेकटीव ऑन इंडियन नेशनलीज्म, जर्नल ऑफ गांधीयन स्टडीज, खंड ३ क्र ३,२००५,पृ १-१५.

५. एथोनी जे पटेल, गांधी: हिंद स्वराज ॲनड आदर रायटिंग, लंडन, १९९७, पृ XXI.

६. रवींद्र कुमार, कास्ट कम्युनिटी ऑर नेशन गांधीज क्वस्ट फॉर पॉपुलर कन्सेन्स इन इंडिया, दिल्ली,१९८३ , पृ ५१.

७. उपरोक्त

८. एम के गांधी, हिंद स्वराज सी.डब्लू.सी.एम.जी. खंड १०, पृ २९०.

९. भिखू पारीख, गांधीज पोलिटिकल फिलोसोफी: ए क्रिटीकल एकजामिनेशन, दिल्ली, ११९५, पृ १८९.

१०. पटेल, गांधी हिंद स्वराज, पृ LIII.

११. कुमकुम संगारी, नैरेटीव ऑफ रेस्टोरेषण:गांधीज लास्ट इएर्स ॲनड नेहरूयन सेकुलरीजम, सोशल सायांटीस्ट, खंड ३०, क्र ३-४ मार्च एप्रिल २००२, पृ ३-३३.

१२. उपरोक्त .